वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII AKOLA MONDAY MAY 5 1884 NO 25

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख ५ माहे मे सन १८८४ इ० अंक २५

वऱ्हाडसमाचाराची किंमत.

	रु०
वर्षाची आगाऊ	६
सहामाही ,,	३
साल अखेर	७
किरकोळ अंकास	०४
डांक हांशील.	
वर्षाचे आगाऊ	०१३
सहामाही	०८
साल अखेर	१०८

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी पावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

नोटिसीबद्दल.

१० ओळींचे आंत	१
१० ओळींपुढें दर ओळीस	०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०४
,, ,, दुसरे खेपेस	०३

WONDERFUL SARSAPARILLA!

This preparation containing all the medical properties of the valuable drug Sarsa, combined with some other useful ingredients, is *guaranteed* to cure obstinate skin diseases, syphilitic eruptions, constitutional syphilis, loss of appetite Nervous and General Debility, costiveness, venerial sores, and all other affections arising from the abuse of mercury.

per bottle Rs 1 *Packing As* 4 *Per doz Rs* 11.

Specifics for Spermatorrhœa Gonnorrhœa, Gleet, Syphilis, and mpotence. In bottles Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 *Cure guaranteed* In failure the money will be returned.

CURE FOR HYDROCELE.

Guaranteed to cure cases to long standing. Warranted to be free from mercury or other injurious drugs. In pots Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 Per doz. Rs. 21 and Rs. 40

W. Rooder and Co
Surgeons Calcutta

ADVERTISEMENT.

We beg to inform the public that we have been appointed Agents for the undermentioned Insurance Companies and that we are now prepared to accept on their behalf Insurances Against ... Upon Houses, Mills, and ...r *Buldings*, Household—...re, Goods, Wares are Merchandise at most favorable terms.

We will be glad to furnish full particulars on application.

Bombay Fire Insurance Company, Limited.

Transatlantic Fire Insurance Company.

North German Fire Insurance Company.

Lubeck Fire Insurance Company.

Samarang *Sea* and Fire Insurance Company.

Batavia Sea and Fire Insurance Company.

Fire Insurance Company Insulinde.

Breul & Co.

Akola
16 April 1884.

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं खालीं लिहिलेल्या आगीचा विमा उतरण्याऱ्या कंपनीच्या तर्फे आह्मास एजंट नेमिलें आहे. आह्मी त्यांच्या तर्फे फार किफाईतवार दरानें आगीपासून घर, गिरण्या, इमारती, घरगुतीसामान, माल आणि सर्वप्रकारचे व्यापाराचे जिन्नस यांचा विमा उतरण्यास तयार आहोत. ज्यास्त माहिती खालीं सही करणाराकडेस मागितली असतां मिळेल.

बांबे फायर इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ट्रान्स आटलांटिक फायर इन्शुरन्स कंपनी नार्थ जर्मन फायर इन् शुरन्स कंपनी ल्युबेक फायर इन्शुरन्स कंपनी सम रांगसा आणि फायर इन् शुरन्स कंपनी बटेव्हिआसी आणि फायर इन् शुरन्स कंपनी फायर इन्शुरन्स कंपनी इनसुलिनडी.

आकोला } ब्रुएल आ
ता० १६ एप्रील सन१८८४ } णि कंपनी

NOTICE

Tenders are invited for the construction of various works in the Local Fund *Department*

Specificutions with torms of Tender will be obtained in the Local Fund office Akola

The contracts will have to be completed within a given period

No reason will be assigned for the rejection of any *Tender*.

नोटीस.

लोकलफंड खात्यांत निरनिराळे प्रकारचीं कामें करण्याबद्दल मक्ते देणें आहेत. करितां ज्यां कोणास मक्ते घेणें असतील त्यानीं आपलीं टेंडरें लोकलफंड आफिसांत आपले पत्रासह पाठवावींत.

कामाबद्दलची विशेष माहिती व टेंडराचे नमुनें आकोलें येथील आमचे आफिसांत मिळतील.

कामें सांगितल्या मुदतींत पुरी केलीं पाहिजेत.

टेंडर नापसंत केल्याबद्दल कारण दिलें जाणार नाहीं.

Walter Laidlaw C E
Local Fund Executive Engineer
Akola District
Local Fnnd Executive *Engineer's* Office Akola 26 4-84.

जाहिरात.

तुकाराम प्रसादकृत—शालोपयोगी पृथ्वीचा भूगोल हिंदुस्थानचे नकाशासह दर प्रतीची किंमत ४ आणे. १० किंवा अधिक प्रती एकदम घेतल्यास टपाल हांसील पडणार नाहीं. तीन महिन्यानीं पैसा देऊं असें खातरी लायक सहीचे पत्र पाठविल्यास १०० प्रती एकदम विक्रीस पाठवूं त्याबद्दल टपालखर्च न पडतां १० रुपये शेंकड्याप्रमाणें कमीशन मिळेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. तारीख २४ माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

तुकाराम बहिरु प्रसाद हेडमास्तर
थाळनेर ता. शिरपूर जिल्हा
खानदेश.

नोटीस.

नादारी मुकद्दमा नंबर ६
सन १८८४.

नमुना (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य जिल्हे अकोले. याचे कोर्टांतून

तमाम सर्व लोकांस कळविण्यासाठीं नोटिस देण्यांत येते कीं, सखाराम वलद मानाजी रहाणार नीरुर तालुका जळगाव हा नादारी आहे असा आज तारीख २४ माहे एप्रिल सन १८८४ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि ता० २७ माहे जुन सन १८८४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाइनीं नेमून देण्याकरतां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरतां नेमला आहे. नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षी समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें नमुद करावीं. ही नोटिस न जाण्याकरतां नेमले ल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पडाण्या करतां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते... बद्दलचा प्रतिज्ञा लेख ... दारानें आपली सही ...

जे सावकार दुसरे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरा पुढें तीच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दोन रजिस्टरी दाखल होतील तारीख २९ माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

(Signed) *Purshotamrao.* E. A.
नादारी कोर्टाचे जज्ज.

नोटीस

आमद अल्ली कासमजी वोहरी दुकान आकोलें यांस खालीं सही करणाराकडून नोटीस दिली जातें कीं आह्मी तुह्मांपाशीं जडावाचे दागिने दोन पत्र्या आंगुसदाना व मोती व चवकडे २ असे आमानत ठेविलेले तुह्मास दोन चार वेळा मागणें केलें असतां देतों देतों ह्मणून अद्याप दिले नाहीं यास्तव या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सदरहू दागिने आणून द्यावे तसें करण्यास चुकाल तर कायदेशीर तजवीज करून नोटीसचिया खर्चा सुद्धां तुह्माकडून भरून घेण्याची तजवीज केली जाईल कळावें.२७-४-८४

(सही) वालचंद वनसी लाल आकोलें-
दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ११ शके १८०६

निजाम सरकारास राज्याभिषेक झाला त्याच्या आदले दिवशीं इत्थंभूत हकीकतीचें एक जमाबंदीपत्रक गव्हरनर जनरल लार्ड रिपन साहेब यांजकडे पाठविण्यांत आलें होतें. त्या खर्डयावरुन पाहतां साडे चार कोटी रुपये राज्यास कर्ज आहे असें दिसून येतें. ही बेडेजावी अंदाधुंदी व्हाइसराय साहेबांस मोठ्या धोक्याची वाटली व आंवरुन खरी अंतस्थ स्थिति काय आहे हें पाहण्या साठीं दिवाण आणि दुसरे कांहीं अधिकारी यांस तुह्मी सांगावें असा व्हाइसराय साहेबांनीं निजामास सल्ला दिला. त्याप्रमाणें शोध व चाकशी सुरूं झाली, आणि दिवाणे साहेबांनीं एक खर्डा तयार केला, तो

गेल्या महिन्याचे २२वे तारीखेस अ०रेसिडेन्ट साहेबांचे मार्फत व्हाइसराय साहेबांकडे रवाना झाला, त्यावरून असें पक्कें दिसतें कीं राज्यास सुमारें एक रुपये कर्ज आहे व त्या पैकीं बरीच रक्कम लहानसहान गांवो गांवच्या अधिकाऱ्यांना नक्कें वेतन देण्याचें राहिल्यामुळें झाली आहे. यापूर्वीं त्यांना निरनिराळ्या जमिनी तोडून देण्याची वहिवाट होती परंतु ती मोडून त्यांच्या कामगिरी बद्दल त्यांना ठरीव वेतनें देण्याची पद्धत हल्लीं सुरूं करण्यात आली आहे व आतां ती ही बदलून पुनः जमिनी देण्याचें घाटत असल्याचें समजतें. एक कोटी कर्ज पैकीं कांहीं कर्ज निजामाच्या खासगींतून ज्यास्त पैसा खर्चिल्यामुळें झालें आहे परंतु ती रक्कम लवकरच खर्ची घालणार आहेत या शिवाय कशी अर्ती दुसरें असें उमगलें आहे कीं सुमोर ७० लक्ष सरकारीं रुपये इतके दिवस जमेंत नव्हते ते अद्यापि वसूल होण्या सारखे आहेत. पेषकारास महिना १० हजार रुपये पगार आहे: आतां त्यांतील दरमहा ९००० रुपये बंद करून ते रुपये पेषकारांनीं डेकन टाईम्स पत्रावरील फिर्यादीच्या फंडास सरकारी खजिन्यांतून जी रक्कम दिली आहे तिचे फेडीकरितां वळवून घेतले जात आहेत.

खुरशिद जहा हे हल्लीं अजमिरास आहेत. त्यांचा बेत सिमल्यास जाऊन व्हाइसराय साहेबांची भेट घ्यावी व त्याजपाशीं आपल्या कांहीं हक्कांच्या बाबदींत बोलणें करावें असा आहे. असें सांगतात कीं खुरशिद जहा हे पुर्ववत् चालीप्रमाणें निजामसाहेबांची गांठ न घेतां राज्या बाहेर निघून गेले, ह्मणून आमची परवानगी मिळेपर्यंत खुरशिदजहाची आपण भेट घेऊं नये अशी निजामांनीं व्हाइसराय साहेबास तार केली आहे.

पण आतां नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्याझेट वरून समजतें कीं खुरशिदजहा हे कोणाला न कळेल अशा रितीनें हैदराबादेस परत आले व ते तूर्त तेथील पब्लिक गार्डनमध्यें आहेत.

मि. गोर्स्ट व निजाम सरकार.

मि. गोर्स्ट एम. पी. हे पार्लमेन्टांतील मेंबर असून गेल्या हिवाळ्यांत निजाम सरकाराशीं वऱ्हाड प्रांत परत देण्याच्या संबंधानें सल्लामसलत करण्या करितां हैदराबादेस आले होते हें सर्वांस माहित असेलच. गेल्या फेब्रुवारी महिन्यांत निजाम सरकारास राज्याभिषेक झाला त्यावेळच्या उत्सवास ते हैदराबादेस होते. बड्या बड्या मेजवान्या, थाटमाट व ऐषआराम यांत दंग झाल्यामुळें त्यांनीं हैदराबादेंत कांहीं दिवस मोठ्या चैनीनें घालविले. त्या थोड्या दिवसांत त्यांस जी खरी खोटी माहिती मिळाली त्यावरून त्यांनीं ' फॉर्टनाइटली रिव्यू ' नांवाच्या वर्तमान पत्रांत एक चुरचुरित लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांत लार्ड रिपन, फारेन आफिस, होतकरू निजाम सरकार, त्यांचे माजी दिवाण, व त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव ह्मणजे हल्लींचे तरुण दिवाण या सर्वांस त्यांनीं दोष दिला दिला आहे. त्यांच्या मतें फक्त पेष्कार उत्तम ठरतात व पेषकारांनीं त्यांना जी मोठी फी दिली तीच त्यांचें एकपक्षीय मत स्थापित होण्यास कारणीभूत झाली असें कोणी सांगतात. कित्येक क्षुल्लक गोष्टी सरकारच्या अथवा लोकांच्या लक्षांत ही आल्या नाहींत त्या त्यांनीं आधारभूत घेऊन त्यावर मोठ मोठे काल्पनिक व्यूह रचिले आहेत. 'निजाम सरकारास व्हाइसराय साहेबांनीं मसनदीवर बसविलें त्यावेळेस एक रत्नजडित तरवार हिंदुस्थानच्या बादशाहिणीच्या वतीनें निजामाच्या कंबरेस लावण्याचें काम व्हाइसराय साहेबांकडे होतें. फारेन आफिसाकडूनही अमूकच बाजूस तरवार असावी या संबंधानें सुचना केली नव्हती. तरवारीच्या पट्ट्याची गुंता गुंत झाल्यामुळें दरबारांत गडबडीनें चुकून दुसऱ्या बाजूवर ती खोवली गेली. सरदार व मानकरी लोकांस हा मोठा अपशकून वाटला, व पुढें थोड्यांही दिवसांनीं निजाम सरकारास महामारीचा उपद्रव झाला होता तो यामुळेंच झाला' असें मि. गोर्स्ट यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे. हा त्याच्या अनुमानाचा एक चांगला मासलाच होय. व्हाइसराय साहेबांनीं अंतःकरण पूर्वक कळकळीनें निजाम सरकारास उपदेश केला व तुह्मी राज्यकारभार सुरक्षित चालविला तर तुमच्या कल्याणासाठीं इंटग्लंड ब्रिटिश सरकार अर्ध्या पायावर उभें आहे वगैरे व्हाइसराय साहेबांचे मनाचे उद्गार ऐकण्याकडे सर्वांचें मनें अगदीं गढून गेलीं होतीं. या संबंधानें मि. गोर्स्ट यांस एक अक्षरही लिहितां आलें नाहीं. ' ज्या दुर्दैवी लोकांच्या श्रमाच्या पैशावर परस्थ मंडळींनीं मजा मारल्या व वाटेल त्या रितीनें पैशाची उधळपट्टी केली त्या लोकांची लार्ड रिपन साहेब अथवा त्यांचे मित्र या पैकीं कोणा एकाला तरी कींव यावयाची होती परंतु कोणी नुसती क्षणभर विचारपूस ही केली नाहीं हें मोठें आश्चर्य होय' हे मि. गोर्स्ट यांचे मार्मिक विचार कागदावर चांगले दिसतात व असें लिहिणें ही सोपें आहे पण ते स्वतः सुद्धां या दोषास पात्र आहेत. अंदाधुंदीमुळें हैदराबादेची भावि स्थिती काय होईल या विषयीं लिहितांना तर मि. गोर्स्ट साहेबांनीं कमाल करून सोडिली आहे. निजामाचें राज्य हें इंग्रज सरकारच्या हिंदुस्थानांतील राज्यास एकाएकी भयप्रद होईल असा ह्मणण्यासारखा कांहीं एक धोका नाहीं असें ते प्रथम ह्मणतात, पण त्यांची त्यांनाच त्याबद्दलची खात्री वाटत नाहीं व त्या मुळें पुढें असें ही ते लिहितात कीं ज्या योगानें ब्रिटिश राज्यास मोठा अपाय होईल अशा तऱ्हेच्या निजाम सरकाराच्या मनोवृत्ति होण्याचा पुष्कळ संभव आहे. मुसलमान लोकांकरितां कालेज स्थापन करण्याच्या मि. उइलन्ड ब्लंट साहेबांच्या युक्तीवर त्यांनीं एक चमत्कारिक कल्पना लढविली आहे ते ह्मणतात कीं हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचें प्राबल्य झाल्यानें हिंदुस्थानचें कल्याण होईल असें ज्यांचें मत आहे ते निजाम सरकाराकडे बोट दाखवितात, व हिंदुस्थानांत फंदफितुर अथवा बंडावा उद्भवल्यास निजाम सरकार पुढारी बनतील आणि १८५७ सालच्या बंडाप्रमाणें हैदराबाद राजनिष्ट राहणार नाहीं. सन १८५७ ह्या सालीं वायव्य प्रांत व हैदराबाद यांच्या मध्यें कांहींच संबंध नव्हतां व ह्मणूनच दक्षिणभाग सुरक्षित राहिला, परंतु हल्लीं निजामाच्या राज्यांतील मोठमोठ्या हुद्याच्या जागा वायव्य प्रांतांतील मुसलमानांनीं भरलेल्या आहेत, व ते आपल्या नातेवाइकांशीं गुप्त पत्रव्यवहार ठेवून कारस्थानें करित असतात असें गोर्स्ट साहेब आपणांस सांगतात. हा कार्यकारण संबंध जोडण्याची मि. गोर्स्ट यांची सुयुक्ति पाहून हंसूं आल्यावाचून राहणार नाहीं. मि. गोर्स्ट साहेबांचा उपदेश मनांत वागविला तर मात्र ते ह्मणतात तसें अक्षरशः घडून येईल. "निजाम सरकार वयांत येई पावेतों माजी सर सालरजंग हेच खरे बादशहा होते. व्यवहारांत प्रतिनिधीच्या कामांत हातखंडा असे ते राज्यकारधुरंधर होते तरी इंग्लिशांच्या धर्तीवर राज्याची व्यवस्था करण्याचा त्यांचा बेत मनांतल्या मनांतच राहिला. ते वांचले असते तर वऱ्हाडप्रांत त्यांनी परत मागितला असता इंग्रज राज्यकर्त्यांस हैदराबादच्या भासमान सुराज्यव्यवस्थेची भुल पडून तो त्यांनीं ही दिली असता. सर सालरजंग यांचा राज्याची बाह्यात्कारें चांगली स्थिती भासविण्याचा बाणाच असे. तथापि खरा प्रकार अगदीं निराळा होता, व लक्षावधि लोकांना विपत्तिच भोगावी लागत होती. तेव्हां त्यांचा अंत लवकर झाल्याकारणानें सुमारें २९ लक्ष लोकांचें जें दुर्दैव पुढें आलें होतें तें टळलें, असें मि. गोर्स्ट साहेब प्रतिपादन करितात. तथापि त्यांत किती तथ्यांश आहे हें सांगणेंच नको. मि. गोर्स्ट साहेबांचे इंग्रजी पत्रांतून आलेले लेख अशाच प्रकारचे आहेत व ते सर्व दिले असतां त्यावर त्यांचा एक लहानसा ग्रंथच होईल. प्रस्तुत आह्मी आपले वाचकास इतकेच सांगून त्यांची रजा घेतों कीं या वरील सर्व लेखावरून निजामाबद्दलची दुष्टबुद्धि किती आहे हे उघड दिसून येतें व त्या करितां लोक त्यावर विश्वास ही तितपतच ठेवतील असें आह्मी मनापासून इच्छितो.

The Berar Samachar

MONDAY, may, 5, 1884

We make room in our to day's issue for the following excellent and instructive speech that was delivered the other day by our worthy Deputy Commissioner Colonel J. Fitz-Gerald when he presided on the occasion of the opening ceremony of the *Babuji Deshmukh N. G.* Library at this station.

"I had been requested to declare this library open and have much pleasure in so doing not only because the building is neat, commodious and well situated, but because, knowing what the intentions of the promoters originally were, I see that they have succeeded in obtaining a building which must surpass their greatest hopes.

There are two points on which I would give the subscribers and managers of this institution a word of advice.

The first is; in what way can this institution be best utilized, the answer to that is simple enough *viz* by making it a favourite resort not only to the subscribers but to others whom you may admit under such rules as may appear desirable.

In other parts of India you will find that this is generally attained by lectures. These are not difficult to get up. The only thing is not to aim too high at first.

There are members of this institution who can give you an interesting lecture on engineering works as the Kurruck Wass alla Tank and can explain in what that tank has fulfilled its expectations and in what details it has been found wanting and the reasons for the same how they are proposed to be remedied and why the remedy has not been at once applied.

Some others of your number may be able to explain which is being done in the *Punjab* in the digging of those gigantic canals beside which any works in the Bombay *Presidency* are nowhere.

Your lectures also should specially, now and again refer to political history, which is all important at present now that self government is to be intrusted more or less to the people.

I will now tell you what you should be careful not to do, *viz,* you should not swamp your library with an establishment. *I* have seen many libraries started and have seen many come to grief because the members or some of them wanted a Karkoon on 6 or 7 rupees and perhaps a peon on 4 or 5

These men in time came to do nothing or became orderless to some one of the members. The rest of subscribers finding the money spent otherwise than on papers, books *etc.* withdrew their subscriptions and the library soon came to an end.

This institution cannot do better than, take example by what is done in the Officer's library where the cost of establishment is one rupee per mensum and yet they have thousands of volumes of valuable books which are looked after by an honourary secretary.

The gentleman who gave the donation of a thousand rupees for this library *viz* B. S. Deshmukh of Mysang is already well known, it being due to his liberality that we have a fountain in the town hall gardens and I hear most willingly and publicly acknowledged with thanks his great liberality and I hope that his name may be remembered as long as this building lasts.

The Town Committee of Akola gave a grant of rupees 500 and the site on the understandin that the building should remain a public library and it is for the members of the Committee to see

that the building be continued to be used for the purpose for which it was granted.

I have great pleasure in declaring this building open.'

THE NIZAM'S STATE RAILWAY.

The following is the report of the directors of the *Nizam's* guaranteed state Railways company to the extraordinary general meeting, to be held on Wednesday, *April* 9.-The company was registered on December 24, 1883, and the contract (approved by her Majesty's Secretary of state for India in Council) between the Government of his Highness the Nizam and the company was executed on December 27. The whole of the 75,000 shares offered for public subscription were allotted in january 1884, and the full amount of 50*l.* per share payable on allotment has been paid, with the exception of 9001, which is in course of realjsation. 12788 shares have been fully paid, and the board of directors have resolved to continue to receive payments from any shareholders who may desire to pay in full. The guaranteed interest of 5*l* per annum is payable on the amount from time to time paid up on the shares. Fully paid shares to the amount of 500,000*l* were, in accordance with the contract, issued on Jan. 23 to the representative of the Government of his Highness the Nizam and 420,0000*l* in cash has been paid to a special account with the company's bankers to the credit of the Government, which is being applied in acquiring the interest of the English shareholders in the existing railway in the Nizam's state. The directors are happy to be in a position to state that his *H*ighness's Government has publicly expressed its complete satisfaction with the contract entered into with the company by the Sirdar Diler Jung, the accredited representative of the Government. *The* directors have appointed Mr Willoughby Furnivall C. E, one of the most distinguished engineers in India, who has just completed the Bengal Central Railway, and whose services have been lent to the company by the Government of India, *to* be their agent and chief engineer at *H*yderabad. Under his supervision three parties are now in the field examining and completing the surveys for *the* new lines to be constructed by the company. One of these parties is, at the request and cost of the Government of India, surveying the line from the *British* frontier to *Bezwada*, which that Government propose shall be constructed in continuation of the company's first section. It is expected that the survey operations will be completed by June and that construction may commence at the close of the rainy season in September. A very satisfactory account of the *Sin*gareni coal has been received, written by *Mr* King, the Deputy rides superintendent of the *Indian* Geological survey, who has personally examined them. On a moderate he considers that there are seventeen million tons (of serviceable coal within 150 feet of the surface, situated in a potision favorable both for extraction and for transport by the copmany's railway It is expected that this coal will not only tend to keep down the workniḡ expenses of the line, but will afford an article of important traffic to be carried over it. The committee of the *London* Stock Exchange has granted aquotation of the company's shares in the official list. There are now 408 registered shareholders in the company.

HYDERABAD, *A*pril 23.

The day previous to the Nizam's installation a memorandum was placed in the Viceroy's hands to show that the indebtedness of the State amounted to 450 lakhs of rupees. The Viceroy, considering the state of affairs to be very serious, requested the Nizam to direct the Minister and other officials to find out how matters really stood This has now been done, and a memorandum drawn up by the Minister was sent yesterday to the Resident, to be forwarded to the Viceroy. The *S*tate debt proves to be about one crore of rupees, the largest item coming under the head of arrears of allowances to petty village officials who formerly were paid by land grants. These land grants were some years ago discontinued, and money payments substituted. *A*rrangements are now being made to revert to the old system. A portion of the debt consists of payments due to the Nizam's private treasury which will probably be written off. The investigation has disclosed another fact, namely, that there are State amounts to *t*he extent of 70 lakhs which hitherto never appeared in the accounts but which are recoverable.

The Peishkar's salary of *R*s 10,000 per month has been temporarily stopped. *R*s 5,000 per month goes towards the repayment of money advanced by him from the treasury to the Deccan Times defence fund.

Khoorshed Jah is at present at Ajmere, from which place he proposes to go to Simla to interviaw the Viceroy respecting the perpetuation of his paigah rights. It is stated that the Jah having left *H*yderabad without *t*he Nizam's permision according to usage, His Highness has telegraphed to the Viceroy requesting that an interview be not granted until the permision has been obtained.

From a late issue of the "Bombay Gazette" we learn that he has returned in a very unobtrusive manner and has put up for the present in the Public Gardens.

वऱ्हाड.

उमरावतीचे डे० क० हे ता. १० अप्रेल रोजीं रात्रीचे गाडीनें मुंबईस गेले तेथून ते विलायतेस जातील व रजे नंतर इकडे परत येतील.

मि० निजामुदीन हे हल्ली रजेंत हैद्राबाद येथें गेले आहेत व तेथून सिमल्यास जाऊन आपणास वऱ्हाडांतील शाळा खात्याचे डायरक्टरची जागा मिळावी अशा विषयी खटपट करणार आहेत असा आमचा हैद्राबाद येथील एक मित्र लिहितो.

मि० वणुगोपाळ मुदालियर यांचे जागेवर सिंकदराबाद येथून येणारे बाबू गृहस्थ दोनचार दिवसां पूर्वी येथे आले. आतां मुदालियर हे तिकडे लवकरच जातील.

मि० अरदेसर दिनशाजी ह्यांस हजार रू० पर्यंत दिवाणी खटले चालविण्याचा अधिकार दिला जाण्या विषयीं शिफारस झाल्याचें समजतें. व तो अधिकार येई पर्यंत ते जळगांवास नजातां येथेंच खजिन्याचे काम पाहतील असें कळतें.

येथील तहशिलदाराचें काम मि० विठूजी नारायण यांस डि० क० साहेबांनीं पाहण्यास सांगितलें आहे. तेव्हां नायब तहशीलदार यांस एकीकडे टाकून दुसऱ्या आफिसांतील इसमास तें काम कां सांगितलें हें समजतनाहीं.

एथील कायमचे पेषकार रा० रा० शंकरराव राजे हे गेल्या आठवड्यांत येथें येऊन आपले कामावर रुजु झाले. व रा० रा० निमौनकर अक्टिंग पेषकार यांस दवतमाळास कायमचे ना० त० नेमिलें.

धान्याच्या बाजारांत दररोज पांचशे पासून सहाशे पर्यंत गाड्या आळशीच्या व गव्हाच्या मिळून येतात. भावांत विशेष फेरफार नाहीं हल्लीं आळशीचा भाव दर खंडीस ७१ रु० पर्यंतचा व गव्हाचा ४० पासून माळपाहून ९९ रु० पर्यंतचा आहे

निजाम सरकारचे दिवाण साहेब यांची स्वारी सिमल्यास लवकरच जाणार आहे. अशी दाट अवाई आहे. कशा करितां जाणार हें खात्री लायक व निश्चयात्मक कळत नाहीं, तरी चांदा रेलवेच्या संबधानें कांहीं विचार करण्या करितां जाणार आहेत अशी फार बोलवा आहे. हल्लीं दिवाण साहेब आणि अलि. रेसिडेन्ट हे उभयतां बोलाराम येथें आहेत.

थोड्या दिवसांपूर्वीं कर्नल लेढलो सी. आय. इ. यांस निजाम सरकारच्या राज्यांतील पोलिस खात्याचे इन्स्पेक्टर जनरल नेमिलें असल्याचें लिहिलें होतें. हल्लीं त्यांनीं विलायतेस जाण्याकरितां तीन महिन्यांची फर्लो घेतली आहे. आणि त्याप्रमाणें ते हैदराबादेहून मुंबईस रवानाही झाले. त्यांना पोंचविण्या करितां स्टेशनवर बरीच मंडळी जमली होती.

यवतमाळ. २-५ ८४.

ता० २९एप्रिल रोजीं रात्रीं सातवाजतां मोठें तुफानाचें वादळ सुरूं असतां माळीपुऱ्यांत एका घरास प्रथम आग लागली. ती विझविण्याचा प्रयत्न निष्फळ होऊन गरीब गुरिबांचीं सुमारें २५ घरें जळून फस्त झालीं. ही आग गांवाचे पूर्व बाजूस लागल्यामुळें इतकेंच नुकसान झालें. पश्चिमेच्या आंगास लागती तर मोठा अनर्थ झाला असता.

मि० जे. हिल क्लार्क, मयत यांची जागा डे. ए. इ. चे क्लर्क सदाशिव रामचंद्र भाटवडेकर यांस दिल्याचें समजतें. सदाशिवराव यांची जागा खालीं आहे.

गांवांत देवींची सांथ सुरूं आहे.

एक गृहस्थ, आपली प्रिया मदिरा इच्या स्वाधीन झाल्यावर दुसरी प्रियसखी धुंडाळण्यास गेले असतां सापत्न भावामुळें च कींकाय (!) त्या दुसरीनें यांचा तिरस्कार केला इतकेंच नव्हे तर यांस चांगलें बक्षीस देवून परत पाठविलें असें समजतें. आणखीं आतां हे आपला पोटाचा धंदा जातो कीं काय या फिकिरींत आहेत असें कळतें.

जाहिरात.

बोरगांव, निपान, अनवी, कुरणखेड, धोतरडी आणि टांकळी तालुके अकोला येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं गंभीरमल मंगणीराम यांचें कर्ज येणें आहे. हें कर्ज वसूल करण्याचा कायदेशीर वारस बापको आहे. असें असून शिवलाल कृपाराम यानें लबाडीनें गंभीरमलच्या मिळकतीचा मी मालक आहे अशा विषयीं सर्व लोकांस खोटी खबर दिल्याचें कळतें. वास्तव कायदेशीर वारस मी आहे माझे समत्ती शिवाय कोणताही व्यवहार शिवलालशी केल्यास तो कायदेशीर होणार नाहीं. सरकारी हुकुमांनीं काहीं मनाइ आली असल्यास त्याजबद्दल माझी तक्रार नाहीं. जोपर्यंत सरकारी हुकुम नसून खोटी हकिकत लोकांस कळवून माझे व्यवहारांत हरकत कोणी केल्यास त्याजवर फौजदारी आणि दिवाणींत दावे केले जातील. कोणाची कांहीं तक्रार असल्यास बोरगांव येथें येऊन आठ दिवसांत निकाल करावा कळावें तारीख २ माहे मे सन १८८४ इ.

(सही) मखू मर्द गंभीर
मल निशाणी खुद.
बांगडी

नोटीस.

नादारी मुकद्दमा नंबर ७
सन १८८४.

नमुना (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य जिल्हे अकोले. याचे कोर्टांतून

तमाम सर्व लोकांस कळविण्यांसाठीं नोटिस देण्यांत येते कीं, नारायण व नागो वलद लक्ष्मण रहाणार हातरूण तालुका बाळापुर हा नादारी आहे असा आज तारीख २७ माहे एप्रिल सन १८८४ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि ता० २७ माहे जुन सन १८८४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाइनीं नेमून देण्याकरतां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरतां नेमला आहे. नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षी समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवे नमुद करावीं. ही नोटिस नें जाण्याकरतां नेमले त्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करतां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे रहाणारे असतील त्यानीं आठ आण्याचे ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तीच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दोव रजिस्टरी दाखल होतील तारीख २९ माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

(Signed) *P*urshotamrao.
नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला

वर्तमानसार.

श्रीमंत गायकवाड यांजवर त्यांनीं आपल्या रेसिडेन्टास तोफांच्या सरबत्तीचा मान दिला नाहीं ह्मणून जो दोष सरकारांतून आला होता त्याचा निकाल होऊन महाराजांनीं हें कृत्य मुद्दाम केलेलें नसून चुकून झालें या मुद्यावर महाराज दोषमुक्त आहेत असा हिंदुस्थान सरकारचा पत्रव्यवहार नुकताच बाहेर आलेला आहे.

कलकत्ता व बेसीन येथून सुएझच्या कालव्यांत अगर अलेक्झांड्रिया येथें जीं गलबतें जावयाची असतील त्यांना २४ तासपर्यंत बंदरांत येऊं द्यावयाचें नाहीं, व जर वाटेनें या गलबतांत महामारीनें लोक मेल्याचें कळेल, तर त्यांना एक आठवडाभर बाहेर ठेविलें जाईल, असा निर्बंध करण्याचा सानिटरी कमिशनानें ठराव केला आहे.

गेल्या सरकारी ग्याझिटांत १९७ गृहस्थांची नेमणूक नोटरी पब्लिकचे जागीं केल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

अफगाणिस्थानांत तोफेचे गोळे ओतण्याकरितां पेशावराहून अठ्ठेचाळीस उंटांच्या ओझ्याइतकें लोखंड काबुलाकडे रवाना झालें आहे.

चीनच्या प्रधानमंडळांतून काढून टाकलेले राजपुत्र प्रिन्स चुंग यांनीं आत्महत्या केल्याचें शांघईहून वर्तमान आलें आहे.

महाराणी साहेबांची प्रकृति संधिवातानें नादुरुस्त झाल्यामुळें त्या आपल्या खोलींत कोंडूनच रहात होत्या, परंतु हल्लीं प्रकृति सुधारत असल्याचें कळतें.

सर एव्हेलिन बेरिंग यांस बिलायतेंत परत बोलावून नेलें आहे.

पुणें येथील नारायण पेठेंत एका वाड्यांत गेल्या आठवड्यांत एक दोन दिवस मोठा चमत्कार दृष्टीस पडत होता. साधारण मनुष्यास एका हातानें धोंडा उचलणार नाहीं एवढ्या आकाराचे धोंडे घरांत येऊन मनुष्यास लागत नसत. हें काम चोरट्यांचें असेल ह्मणून पोलिसचे शिपाई ही आले होते, पण त्यांच्या देखत धोंडे आल्यामुळें तेही थक्क झाले ! या घरांत कड्या कुलपें घातलेल्या जागा एकदम मोकळ्या होऊन आंतून कोणी गेल्याचा ही भास होई असें प्रत्यक्ष पाहिलेले कांहीं लोक सांगतात ! पु. वै.

विद्याव्यसनी जे पुरुष असतात त्यांना आपल्या प्रपंचाची किंवा आपल्या मागें आपल्या मुलामाणसांचें कसें होईल वगैरे गोष्टींची मुळींच काळजी नसते, व याचें कारणही उघडच आहे कीं, अशा प्रकारचे विचार त्यांचे मनांत येण्यास सवडसुद्धां नसतें. ज्ञानजन्य सौख्य मिळविण्यांत दंग झालेल्या व ज्यांच्या शोधानें व प्रयत्नानें सर्व जगास अनुपमेय लाभ झालेले असे लोक हें जग सोडून परलोकवासी झाल्यानंतर त्यांच्या पश्चात राहिलेल्या परिवारास राजाश्रय मिळणें हें अत्यंत योग्य असून विलायतेंत याप्रमाणें आश्रय देण्याची वहिवाट आहे. कै० केरोपंत नाना छत्रे ह्यांच्या कुटुंबास सरकारानें पेन्शन करून द्यावें अशी सूचना आमचे बंधु टाइम्स आफ इंडियाकर्ते यांनीं केली आहे. नानांचे गुरु कै० बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचे मागें त्यांचे कुटुंबास पेनशन मिळत होतें, ही मागील वहिवाट लक्षांत आणून मुंबई सरकारानें टाइम्सच्या ह्मणण्याचा जर विचार केला तर नामदार फर्ग्युसन साहेब यांस मोठी भूषणाची गोष्ट होणार आहे.

वर्ल्ड नांवाच्या प्रसिद्ध पत्राच्या एडिटरास एका लार्डाची अब्रू घेतल्याचा खटला होऊन चार महिन्यांचा शिक्षा झाली.

विलायतच्या टाइम्स पत्राचा माजी एडिटर मि- चेनरी नुक्ताच मेला असून त्यागें जें मृत्युपत्र केलें त्यांत २,१०,००० रुपयांची मिळकत दाखल केली आहे. टाइम्सचा एकच एडिटर नसतो, व हे सर्व एडिटर नौकर असतात !!

क्लाकसी व कॉस्पियन सी आणि पर्शियनगल्फ हीं जोडण्याकरतां पर्शियामधून रेलवे करण्याचें जें रशियानें योजलें आहें त्या रेलवेस १,२९,००,००,००० रुपये लागणार असून त्याच्यायोगानें हिंदुस्थानाकडचा रशियाचा व्यापार दिढीनें वाढेल असा राशियन शोधकांचा विचार आहे असें सांगतात. ज्ञा० प्र०

जमाबंदीच्या कोडांतील कलम २१४ अन्वयें अहमदनगर व खानदेश या दोन देशांतील बऱ्याच गांवांवर दंड आकारण्याचें ठरलें असून त्या दंड आकारणीचे ४ वर्ग टरले आहेत. या दंड आकारणीच्या रकमा अनुक्रमें दर गांवास २९०,१९०,१०० व ९० अशा आहेत. या गांवांची संख्या एकंदर ७३८ असून त्यांपैकीं ६९३ खानदेशांपैकीं व बाकीचीं ४९ अहमदनगरपैकीं आहेत.

मसुरी येथें रहाणाऱ्या एका बंगाली सिव्हिलियनाची बायको नुकतीच प्रसूत होऊन तिला एकेकाळींच चार मुलें झालीं. बायको व मुलें सुरक्षित आहेत, मात्र या बिचाऱ्या सिव्हिलियनाचें एकदम इतकें कुटुंब वाढलें गेल्यामुळें त्याचा वाढता खर्च चालविण्याकारितां त्याचा सरकारी पगार वाढविण्यांत येतो कीं काय हें पहावयाचें आहे. सरकारांतून हा पगार वाढविण्यांत येवो अगर न येवो, परंतु अनेक प्रसंगीं अशाच कांहीं तरी सबबींवर गोऱ्या सिव्हिलियनांचे पगार वाढल्याची उदाहरणें पूर्वीं घडलीं नाहींत असें मात्र नाहीं, यावरूनच हल्लींच्या या प्रसंगीं असा कांहीं प्रकार घडेल कीं काय याविषयीं अंमळ धास्ती वाटूं लागण्यास कारण आहे.

आडमिरल हुएट यांचे अबिसीनियांत चांगलें आदर आतिथ्य झालें.

चीन देशांतील जुनें प्रधान मंडळ काढून टाकल्यामुळें तेथील संपूर्ण रयतेस आनंद झाला आहे असें कळतें.

हिंदुस्थानांतून स्पेन देशीं जाणाऱ्या सर्व प्रकारच्या गलबतांस क्वारंटाइनचे नियम लागूं करण्यांत आले आहे.

इजिप्टच्या जमाबंदीच्या स्थितीचा विचार करण्याकारितां कान्फरन्स बसावयाचें आहे असें डेलीन्युज पत्रांत लिहिलें आहे.

राजपुत्र ड्यूक आफ एडिंबरो यांस गेल्या ता. २० रोजीं कन्यारत्न झालें. ने० ओ०

कलादगी येथील एक वाण्याचा मुलगा शेल्यापा नांवाचा रात्रीं जेवणखाण आटपून घरांत उकडतें ह्मणून शेजारचे दुकानांत चटई व घोंगडी घेऊन निजावयास गेला. तो जाण्याचे पूर्वींच एक नाग त्या जागीं हवा घेत स्वस्थ पडला होता. त्यावर सदहू मुलानें चटई घातली, व त्यावर घोंगडी टाकून निद्रिस्थ झाला. त्याचे लोळण्यांत सदर नाग चिरडून मेलेला सकाळीं दृष्टीस पडला. दैवगति विचित्र आहे ! ! !

रोहरी येथें एक मनुष्यभक्षक सुसर एका साहेबांनीं मारिली. तिनें आजपर्यंत १३ मनुष्यें गट्ट केलीं. ही सुसर २३ फूट लांब होती. ह्या मगरीचें विदारण केलें तेव्हां तिच्या कोठ्यांत सोन्याच्या नथी, बांगड्या वगैरे मिळून बराच विषय निघाला.

तुर्की तारायंत्राचा रस्ता बगदादपर्यंत मोकळा असून पुढें मात्र त्याला अडथळा झाला आहे.

शेंडीहून आफ्रिका बर्बरकडे येणाऱ्या ३०० लोकांची बंडवाल्यांनीं कत्तल केली.

नोटीस.

पार्वती मर्द सदाशिव बढे राहणार बावनबीर तालुके जळगांव जिल्हे अकोला इस खालीं सही करणार या नोटीशीनें कळवितो कीं ‘सदाशिव विठ्ठल बढे’ यांच्या नांवानें पाच सात वर्षांपासून चालत आलेली शेरी तालुके अकोट येथील दुकानांत आमची शराकत आहे. त्यांत आमचा हिस्सा ८ आणेचा व एक चार आण्याचा हिस्सा तुकाराम वल्लद आकाजी टिकाळे यांचा आणि राहिलेला चार आणेचा आपले नवऱ्याचा आहे. आतां हें दुकान जरी चालतें सदाशिवाच्या नांवानें तरी आमचा वाटा असल्या कारणानें दुकान सबंधाची जोखीम आह्मावर ही आहे. आतां सदाशिव विठ्ठल हे मरून सुमारें १ महिने झाले तेव्हां दुकानांतील देव घेव फिर्याद अर्याद करणें आह्मी घेतलें आहे. पण दुकान फक्त सदाशिव विठ्ठलच्या नांवानें चालत असल्यामुळें सरकार आह्माजवळ मुखत्यार पत्र नाहीं ह्मणून दिवाणींत कामें चालविण्यास अडकांठी अणिते. सदाशिव विठ्ठल जिवंत होते तोपर्यंत काम बरोबर चालले होतें आतां ते वारले आहेत तर आपणास दुकान आपआपल्या नवऱ्याच्या नांवानें सतत पुढें चालविणें असल्यास देवघेवीच्या सबंधानें दिवाणींतील फिर्यादी चालविण्यास आह्माला मुखत्यार पत्र द्यावें ह्मणजे कायदेशीर सर्व कामें चालू होतील. तुह्मांला माहित आहे कीं कायदेकानूच्या नियमाप्रमाणें कुळा कडील पैसे मुदतीबाहेर गेल्यास मिळत नाहींत, त्याप्रमाणें हल्ली कांहीं कुळां कडील बाक्या कायद्याच्या मुदती बाहेर जात आहेत व पुढें ही अशीच स्थिती राहिल्यास जातील, शिवाय फिर्यादी केलेले मोकदमे या आपल्या मुखत्यारपत्र न देण्याच्या हट्टा मुळें बुडत आहेत. तर आपणाला होईल तितकें लवकर मुखत्यारपत्र दिलें पाहिजे हें एक. दुसरें आपणाला दुकान पुढें चालविणें नसल्यास दुकानास नुकसान असल्या कारणानें आपल्या वाट्याचे रुपये निघतील ते आपण देऊन कायद्या प्रमाणें दुकाना वरील आपला हक्क सोडावा. शिवाय तिसरें शराकती वगैरे आह्मांला कांहीं ठाऊक नाहींत व सर्व दुकान आमचें आहे असें आपलें ह्मणणें असेल तर आमच्या नांवच्या ज्या रकमा जमा आहेत. त्या देऊन टाकून आमचा संबंध तोडा. या तिन्ही गोष्टी आपणा पुढें ठेविल्या आहेत आपणास यांतील जी पसंत पडेल ती कबूल करून व्यवस्था करावी. या तिन्ही पैकीं एक ही गोष्ट आपण न कराल तर इतके दिवस मुदती बाहेर फिर्यादी गेल्यामुळें जे रुपये बुडाले आहेत व पुढें बुडतील आणि शिवाय मुखत्यारपत्र नसल्यामुळें जे खटले रद्द होऊन नुकसान होईल ते सर्व आपणावर पडेल हें या नोटिशीनें मी आपणास कळवितो. या पुढें कोणतीही तक्रार ऐकिली जाणार नाहीं व नफा नुकसानीचे आपण जबाबदार व्हाल. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत उत्तर आलेंच पाहिजे नाहींतर मला सरकार रितिप्रमाणें फिर्याद करावी लागेल. कळावें तारीख १० माहे एप्रिल सन १८८४ इसवी.

सही रामचंद्र शुबकस दस्तुर खुद्द
राहणार शेरी तालुके
आकोट.

नोटीस

शेट जोरावरमल गंगाधर साहू दुकान अकोला यांस नोटीस देण्यांत येते कीं पिस्तमजी आणि कंपनी दुकान अकोलें यांणीं मजला असें कळविलें आहे कीं त्यांणीं व आपण मिळोन ताजनापेंठ येथिल नवीन बाजारांत नंबर १०,११ आणि १२ चीं दुकानें व नंबर १२ चे दुकानाचे पश्चिमे कडील जागा शराकतींत घेतली असोन त्यावर दुकानें बांधण्यासाठीं त्यांणीं कांहीं पैसा व विटा व कवेलु वगैरे ही दिले असोन आपण अद्याप पावेतों त्या जागा दुकानें बांधण्यास किती खर्च लागला व दुकानें तयार झाल्यापासून भाड्याचें उत्पन्न किती जालें या बद्दल हिशोब त्याजला दिला नाहीं यास्तव तो हिशोब आपल्या पासून घेण्यासाठीं त्यांणीं आपले तर्फे मजला वकील नेमिलें आहेतर आपण या नोटीसीचे तारखेपासून १९ दिवसांचे आंत खरा व पूर्ण हिशोब सदरी दुकानांचे खर्चाचा व उत्पन्नाचा माझे हाफिसांत दाखल करावा ह्मणून आपणास रजिष्टर नोटीस दिली असतां आपण न घेतां परत केली या साठीं ही नोटीस वर्तमानपत्र द्वारा आपल्यास देण्यांत येत आहे नाहींतर वर्तमानपत्रद्वारा नोटीस द्यावी असा माझा हेतु नव्हता असुतरी हल्लीं आपणावर लिहिलेप्रमाणें सर्व हिशोब आजपासून १९ दिवसांचे आंत माझे हाफिसांत दाखल करावा. तसें न केल्यास कोर्ट मार्फत हिशोब मागणें मजला भाग पडेल व त्यांत माझे पक्षकारांस जो खर्च लागेल तो आपणास द्यावा लागेल तें कळावें. ता० ३०।४-८४ इ०

(सही) पांडुरंग गोविंद वकील.

हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.